महाराष्ट्र शासन
सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, रामकृष्ण परमहंस मार्ग, टपाल पेटी क्र.४५६, नाशिक-२.
दुरध्वनी क्र. ०२५३- २५७७२२० (वै)/(फॅक्स), २५७९४१०/२५७९८८७/२३१६६५७/२३१७०३६ (का.)
Web (nashik.dvet.gov.in) Email- est.ronsk@dvet. gov.in

जा.क्र.प्राकाना/आस्था/अ-१/२०२०/ १३४६ दिनांक : ०५ /०२/२०२०

विषय :- नियतकालीक बदली २०२० च्या अनुषंगाने गट-क संवर्गातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.प्राकाना/आस्था/अ-१/२०२०/८९८ दि. २६-०१-२०२०
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/ व्यशि-५, दि. १३/१२/२०१९
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/ व्यशि-५, दि. २०/०९/२०१९
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/ व्यशि-५, दि. २७/०९/२०१९
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि. ०९/०४/२०१८

**परिपत्रक :-**

उक्त संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये नियतकालीक बदली प्रक्रिया राबविणेसाठी निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार नियतकालीक बदली २०२० करिता या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्था/कार्यालयातील गट-क व गट-ड या संवर्गातील रिक्त पदांची यादी या कार्यालयाच्या उक्त संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यांत आलेली आहे

तदनुषंगाने या विभागातील संस्था/ कार्यालयामध्ये गट-क संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यास संस्थेत/ कार्यालयात रुजू झालेपासून त्याच संस्था/ कार्यालयात दि. ३१-०५-२०२० पर्यंत किमान ६ वर्ष इतका कालावधी पुर्ण होत आहे, अशा अवघड तसेच बिगर अवघड क्षेत्रातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी यासोबत प्रसिध्द करण्यांत येत आहे. तदनुषंगाने संबंधीत संस्था/ कार्यालय प्रमुखांनी सदरचे परिपत्रक व त्यासोबत जोडलेली बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणून देऊन त्याची पोच दप्तरी दाखल ठेवावी. तसेच सदर यादीत ज्या कर्मचाऱ्यास संस्थेत/ कार्यालयात रुजू झालेपासून त्याच संस्था/ कार्यालयात दि. ३१-०५-२०२० पर्यंत किमान ६ वर्ष इतका कालावधी पुर्ण झालेला आहे, परंतू अशा कर्मचाऱ्यांचा समावेश सोबतच्या यादीत झालेला नाही, अथवा ६ वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला नसतांनाही एखाद्या कर्मचाऱ्याचा समावेश सदर यादी मध्ये करण्यांत आला आहे असे निदर्शनास आल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधीत संस्थाप्रमुखांनी कर्मचाऱ्यांचे आवश्यक ते अभिलेख तपासून तसे या कार्यालयास तात्काळ अवगत करावे.

तसेच सदर यादीबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांना काही आक्षेप/ हरकत असल्यास त्यांनी सदरची यादी प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आंत संबंधीत संस्था/ कार्यालयप्रमुखांमार्फत या कार्यालयास कळवावी. सदर बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी ही या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **(nashik.dvet.gov.in)** उपलब्ध्द आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

(पी.एम.वाकडे)
**सहसंचालक**

प्रति, संबंधीत कर्मचारी,

प्रत :- १) मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१. (कार्यासन क्रं. ४) यांना माहितीसाठी सविनय सादर.

D:\Badli\MASTER DATA 2020\Circulars.doc

२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, नाशिक /अहमदनगर /जळगाव /धुळे.
३) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सर्व
४) प्रकल्प अधिकारी, शासकीय आदिवासी औ.प्र.संस्था, सर्व
५) मुख्याध्यापक, शासकीय तांत्रिक विद्यालय सर्व
६) अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र सर्व
७) उपप्राचार्य, ए.व्ही.टी.एस., नाशिक.
८) कार्यसन क्र. अ-६ प्रादेशिक कार्यालय, नाशिक.